# अपर आयुक्त, आदिवासी विकास,अमरावती

**पोलीस आयुक्तालयाजवन, टि.बी.हॉस्पीटच्या मागे अमरावती**

**दुरध्वनी क्र.07212553966/67 फॅक्स न.07212553968**

**E_mail:-** atc.amr-mh@gov.in


क्रमांक आस्था-2017 /प्रक्र./का.1(क)/ /2017
कार्यालय अपर आयुक्त आदिवासी विकास अमरावती
दिनांक 17.03.2017

**प्रति,**
मा.सहायक संचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
जी.टी.हॉस्पीटल,सी पी ऑफीसचे पाठीमागे (लोकमान्य टिळक मार्ग)
नविन मंत्रालय,मुंबई.

विषय:- वर्ग 3 मधील संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबतची जाहिरात प्रसिध्दी बाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, अमरावती विभागातील वर्ग-3 संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात सुचना तीन प्रतीमध्ये सोबत जोडलेली आहे. सदर जाहिरात प्रसिध्दीच्या संदर्भात खालील प्रमाणे तपशील देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | जाहिरात देणा-या अधिका-याचे नाव व पदनाम/पत्ता/दुरध्वनी क्रमांक | अपर आयुक्त, आदिवासी विकास अमरावती पोलीस मुख्यालयाचे समोर,टी.बी.हॉस्पीटलचे मागे,अमरावती |
| 2 | कोणत्या तारखेस प्रसिध्दी द्यावी | 03 /04/2017 |
| 3 | प्रसिध्दीचे स्वरुप | वर्ग – 3 मधील विविध संवर्गाची रिक्त पदे सरळसेवेने भरणे |
| 4 | प्रसिध्दीचे क्षेत्र | महाराष्ट्र राज्य |
| 5 | दुरध्वनी क्रमांक | 2553966/67 |
| 6 | जाहिरात देयके कोणत्या नावे करावयाची आहे त्या कार्यालयाचे नाव व पत्ता | अपर आयुक्त,आदिवासी विकास,अमरावती |

अपर आयुक्त,
आदिवासी विकास अमरावती

प्रत:-
1.उपसंचालक, माहिती व जनसंपर्क अमरावती विभाग अमरावती.

अपर आयुक्त,
आदिवासी विकास अमरावती

महाराष्ट्र शासन,

**अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती.**

अपर आयुक्त,आदिवासी विकास,अमरावती पोलीस मुख्यालयाचे समोर,टी.बी.हॉस्पीटलचे मागे, अमरावती 444603

दूरध्वनी क्र.2553966/2553967 फॅक्स क्र.2553968 E_mail :atc.amr-mh@gov.in

## <u>जाहिर सुचना</u>

अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील धारणी,पांढरकवडा,किनवट, पांढरकवडा, अकोला, औरंगाबाद,कळमनुरी,पुसद या प्रकल्पांतर्गत असलेली कार्यालये/ शासकीय आश्रमशाळा/ शासकीय वसतिगृहातील विविध वर्ग-3 संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरिता पात्रताधारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागवित आहेत.दिनांक -03/04/2017 ते 24/04 /2017 पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. ऑनलाईन अर्जाव्यतिरिक्त इतर कोणतही अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | पदांची संख्या |
|---|---|---|---|
| **1** | गृहपाल (स्त्री) | रुपये 9300-34800/- ग्रेड पे 4300/- | **05** |
| **2** | गृहपाल (पुरुष) | रुपये 9300-34800/- ग्रेड पे 4300/- | **06** |
| **3** | अधिक्षीका (स्त्री) | रुपये 5200-20200/- ग्रेड पे 2400/- | **12** |
| | एकुण | | **23** |

उपरोक्त पदाची सविस्तर जाहीरात व अर्जाचा नमुना http://maharectuitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर दिनांक-03/04/2017. पासुन उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर भरतीविषयी सर्व माहिती हे webside वरच उपलब्ध राहणार आहे याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

(गिरीश सरोदे)
अपर आयुक्त,
आदिवासी विकास,अमरावती.

| अ. क्र. | पदाचे नाव | नियुक्ती प्राधिकारी | समांतर आरक्षणानुसार प्रवर्ग | | सामाजिक आरक्षणानुसार प्रवर्गनिहाय पदे | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ जा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | खुला | |
| 7 | अधिक्षीका (स्त्री) | अपर आयुक्त आदिवासी विकास, अमरावती | महिला | | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 0 | 9 | 12 |
| | | | अपंग | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | | चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायु | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | | श्रवण शक्ती तील दोष | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | माजी सैनिक | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | प्रकल्प ग्रस्त | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | भुंकप ग्रस्त | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | अंशकालीन | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | खेळाडू | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | संमांतर आरक्षणा व्यतिरिक्त पदे | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | एकूण | | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 0 | 9 | 12 |

| अ. क्र. | पदाचे नाव | नियुक्ती प्राधिकारी | समांतर आरक्षणानुसार प्रवर्ग | | सामाजिक आरक्षणानुसार प्रवर्गनिहाय पदे | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ जा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | खुला | |
| 10 | गृहपाल (पुरुष) | अपर आयुक्त आदिवासी विकास, अमरावती | महिला | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | अपंग | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | | चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायु | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | | श्रवण शक्ती तील दोष | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | माजी सैनिक | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | प्रकल्प ग्रस्त | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | भुंकप ग्रस्त | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | अंशकालीन | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | खेळाडू | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | संमांतरआरक्षण व्यतिरिक्त पदे | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | एकूण | | 0 | 0 | 0 | 1 | 2 | 0 | 0 | 0 | 3 | 6 |

| अ. क्र. | पदाचे नाव | नियुक्ती प्राधिकारी | समांतर आरक्षणानुसार प्रवर्ग | | सामाजिक आरक्षणानुसार प्रवर्गनिहाय पदे | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ जा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | खुला | |
| 11 | गृहपाल (स्त्री) | अपर आयुक्त आदिवासी विकास, अमरावती | महिला | | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 2 | 5 |
| | | | अपंग | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | | चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायु | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | | श्रवण शक्ती तील दोष | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | माजी सैनिक | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | प्रकल्प ग्रस्त | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | भुंकप ग्रस्त | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | अंशकालीन | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | खेळाडू | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | संमांतर आरक्षणा व्यतिरिक्त पदे | | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | एकूण | | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 2 | 5 |

| | |
|---|---|
| पद ज्या वर्गातील व सेवेतील असेल तो वर्ग व ती सेवा: | वर्ग 3 |
| नोटीस देऊन नियुक्ती समाप्त करण्यात येते काय, असल्यास, कोणत्या शर्तीवर ? | होय, नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार नियुक्ती समाप्त करण्यात येते. |
| (अ) कर्तव्य | नियमानुसार |
| (ब) उमेदवारांना जेथे सेवा करावी लागेल त्या कार्यालयाचे/कार्यालयांचे ठिकाण/ ठिकाणे | अपर आयुक्त,आदिवासी विकास,अमरावती तसेच या विभागातील धारणी/पांढरकवडा/किनवट/ अकोला/ औरंगाबाद/ पुसद/ कळमनुरी या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेले कार्यालय,निवासी शासकीय आश्रमशाळा,शासकीय वसतिगृहे. |
| निवडण्यात आलेल्या उमेदवारांना कामावर केव्हा यावे लागेल ? | नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन 15 दिवसाचे आंत |
| | गृहपाल (स्त्री)-9300-34800 ग्रेडपे-4300 |
| | गृहपाल (पुरुष)-9300-34800 ग्रेडपे-4300 |
| | अधिक्षीका-स्त्री -5200-20200 ग्रेडपे-2400 |
| पदोन्नतीच्या संधी | शासन नियमानुसार |
| वयोमर्यादा (कोणतीही असल्यास) | शासन नियमानुसार सर्वसाधारण उमेदवारासाठी 38 वर्षे, मागास-वर्गीयांसाठी 43 वर्षे , अपंग/माजी सैनिक/खेळाडू/ अपंग/ प्रकल्प ग्रस्त व अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठी शासन नियमानुसार शिथीलक्षम. माजी सैनिकांना वयोमर्यादा 45 वर्षे राहील. |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| अधिवास | महाराष्ट्र |
| शैक्षणीक अर्हता | खालील प्रमाणे |

**<u>शैक्षणीक अर्हता</u>**

| | | |
|---|---|---|
| गृहपाल (स्त्री) | 1 | समाज कार्य किंवा समाजकल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील पदव्युत्तर पदवी . (एमएसडब्ल्यू) |
| गृहपाल (पुरुष) | 2 | समाज कार्य किंवा समाजकल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील पदव्युत्तर पदवी .(एमएसडब्ल्यू) |
| अधिक्षक (स्त्री) | 3 | समाज कार्य किंवा समाजकल्याण प्रशासन किंवा आदिवासी कल्याण किंवा आदिवासी कल्याण प्रशासन शाखेतील पदवी. (बीएसडब्ल्यू) |
| समान अर्हतेचा स्वीकार करता येईल काय अशा अर्हता कोणत्या? | | नाही |
| वयोमर्यादा (कोणतीही असल्यास) | | वरिल सर्व पदांसाठी जाहीरतीच्या प्रसिध्द होणाऱ्या दिनाकांस किमान 18 वर्षे पुर्ण व कमाल सर्वसाधारण उमेदवारासाठी 38 वर्षे,मागासवर्गीयांसाठी 43 वर्षे |
| राष्ट्रीयत्व | | भारतीय |
| अधिवास | | महाराष्ट्र |

वरिल सर्व पदांसाठी शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेली संगणक हाताळणी /वापराबाबतचे प्रमापणत्र धारण करणे आवश्यक राहील.

**उमेदवार निवडीची पध्दती**

1. पद क्र. 1 ते 3 संवर्गातील पदांसाठी मराठी ,इंग्रजी,सामान्यज्ञान,बौध्दीक चाचणी या विषयांवर प्रश्नांकरिता एकुण 200 गुणांची 100 प्रश्नांची लेखी परिक्षा राहील.
2. शासन नियमाप्रमाणे गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने लेखी परीक्षेत मागासवर्गीय उमेदवारांना 45 % (90 गुण) प्राप्त करणे आवश्यक राहील.

**--अर्ज करण्याची पध्दत व सर्वसाधारण सूचना--**

1. जाहिरातीत नमुद केलेल्या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय जाहीरात प्रसिध्द होणाऱ्या दिनाकांस गणले जाईल.उमेदवाराचे वय किमान 18 वर्षे व कमाल 38 वर्षे पुर्ण असावे. मागासवर्गीय उमेदवारांना 5 वर्षे शिथीलक्षम राहील.
2. अपंग, खेळाडु. प्रकल्पग्रस्त, भुकपंग्रस्त, अंशकालीन उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा शासन नियमानुसार शिथीलक्षम राहिल.
3. जाहिरातीत विहित केलेल्या नमून्यात अर्ज ऑनलाईन पध्दतीने http://maharectuitment.mahaonline.gov.in संकेतस्थळावर भरुन त्याची प्रिंट सादर करावी . उमेदवाराची स्वाक्षरी व फोटो नसलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
4. अर्जासोबत कोणतीही शैक्षणिक कागदपत्रे जोडू नये.
5. उमेदवारांस मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक आहे.
6. लेखी परिक्षेसाठी व मुलाखतीसाठी उमेदवाराला स्वखर्चाने यावे लागेल.
7. उमेदवाराने जाहिरातीत नमुद केलेल्या पदांचा बारकाईने अभ्यास करावा.उमेदवाराने अर्जामध्ये नमुद केलेली सर्व माहिती बरोबर आहे असे गृहित धरुन कोणत्याही टप्प्यावर पडताळणीच्या अधिन राहून अर्ज स्विकृत करण्यात येतील. उमेदवाराने ज्या पदांसाठी अर्ज केला आहे त्या पदासाठी आवश्यक त्या सर्व अर्हता/आरक्षण उमेदवार धारण करित नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.
8. निवड झालेल्या उमेदवारांची या विभागातील कार्यक्षेत्रांतर्गत असलेल्या जिल्हयातील कोणत्याही प्रकल्प कार्यालय / शासकीय वसतिगृह / शासकीय आश्रमशाळेत नियुक्ती दिली जाईल. या विभागाची शासकीय वसतिगृहे / शासकीय आश्रमशाळा निवासी असल्याने उमेदवारास मुख्यालयी राहणे बंधनकारक राहील.
9. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती (ब,क,ड) विशेष मागासवर्ग व इतर मागासवर्गीय उमेदवारांची निवड झाल्यावर सदर उमेदवारांनी सहा महिन्यांच्या आत संबंधीत प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती विभाग, अमरावती यांचे कार्यालयास जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्याची नियुक्ती रद्द करण्यात येईल.
10. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विमुक्त जाती / भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29.1.2004 पासून अमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे तत्त्व (क्रिमीलेअर) वि.जा. अ, भ.ज. (ब/क/ड) इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग तसेच महिला व खेळाडु या समांतर अरक्षणातील उमेदवारांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन 2015-16 या कालावधीतील (नॉन-क्रिमिलेअर) प्रमाणपत्र धारण केलेले असले पाहिजे.
11. महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्र. 82/2001/मसेआ/2000/ प्रक्र-415/ का-2 दिनांक 25.5.2001 मधील तरतूदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्तिगट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे सन 2015-16 या कालावधीतील नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
12. सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेतंर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व सेवायोजन कार्यालयाकडे त्या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदवीधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील गट-क पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी तशी नोंद केलेल्या उमेदवारांनाच अंशकालीन या राखीव प्रवर्गासाठी अर्ज करता येतील.
13. उमेदवार माजी सैनिक असल्यास सैनिक कल्याण बोर्डामध्ये नांव नोंदणी केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (सैनिक जर सेवेत असतांना युध्दात किंवा विशेष मोहिमेत दिवंगत झालेत किंवा सेवते असतांना कायमचे वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरवून सेवानिवृत्त केले असतील तर अशा सैनिकांच्या पाल्याचा, पत्नीचा भरतीसाठी शासन निर्णयातील तरतूदीनुसार विचार केला जातो.)

14. **<u>जाहिरातीत दिलेल्या पदांची संख्या कमी अथवा जास्त होऊ शकते. त्यामुळे सामाजिक व समांतर आरक्षणाच्या पदामध्ये बदल होऊ शकतो.</u>**
15. निवड झालेल्या उमेदवारांना रुजू झाल्याच्या दिनांकापासून किमान 10 वर्षापर्यंत विभाग बदलीने अथवा इतर खात्यात विनंती बदलीने जाता येणार नाही.
16. **<u>अर्जात चुकीच्या किंवा अपूर्ण नोंदी असल्यास व योग्य पात्रताधारक नसल्याचे आढळून आल्यास असा अर्ज विचारात घेतला जाणार नाही .</u>**
17. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
18. शासन निर्णय वित्त विभाग क्र.अंनियो-1005/126/सेवा 4 दि.31/10/2005 अन्वये राज्य शासनाच्या सेवेत दिनांक 1/11/2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यासाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू असेल. सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू राहणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार मानधन / वेतन व भत्ते मिळतील.
19. उमेदवाराने जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांचा बारकाईने अभ्यास करावा. उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती बरोबर आहे असे गृहित धरुन कोणत्याही टप्प्यावर पडताळणीच्या अधिन राहून ऑनलाईनद्वारे अर्ज स्विकृत करण्यात येतील. उमेदवाराने ज्या पदांसाठी अर्ज केला आहे त्या पदासाठी आवश्यक त्या सर्व अर्हता /आरक्षण उमेदवार धारण करित नसल्याचे कोणत्याही टप्यावर निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.
20. उमेदवारांच्या पद निहाय लेखी परीक्षा एकाच दिवशी व एकाच वेळेत घेण्यात येतील.
21. शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र-आस्था-2012/प्रक्र 88/का-15 दिनांक 16/04/2012 अन्वये गठित केलेल्या निवड समितीमार्फत पात्रता धारकांची निवड करण्यात येईल.
22. पात्र ठरलेल्या उमेदवारांना अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडुन नियुक्ती आदेश देण्यात येतील.
23. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. पी.आर. ई 2002/3395/ प्राशि-1 दिनांक 27 फेब्रुवारी 2003 अन्वये राज्यात सुधारित प्राथमिक शिक्षण सेवक योजना कार्यान्वित करण्यात आली असुन सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार शिक्षण सेवकाचा कालावधी हा तीन वर्षे इतका राहील.
24. महिला उमेदवारांचे लग्नानंतर नावांत बदल असल्यास तशी राजपत्राची प्रत सादर करावी लागेल.
25. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग व क्रिडा विभाग क्र.रक्रिधो-2002/प्र.क्र.68/क्रियुसे-2 दिनांक 30/4/2005 मधील तरतूदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडूसाठी आरक्षण असल्याने, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ( सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-अ प्रमाणे विहित प्रमाणपत्र) खेळाचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे खेळाडू प्रमाणपत्र. तसेच नॉन-क्रिमीलेअर गटात मोडत असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे (तहसिलदार) प्रमाणपत्र खेळाडु उमेदवारास द्यावे लागेल.
26. अपात्र ठरलेल्या अर्जाचे परिक्षा शुल्क परत केले जाणार नाही.
27. जाहिरातीत दर्शविलेले आरक्षण हे विषयनिहाय नसून संवर्गनिहाय (पदनिहाय) आहे.
28. उमेदवारांने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये प्रतिज्ञापत्र दयावे लागेल.
29. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील 865 गावामधील मराठी भाषीक उमेदवारांना शासन परिपत्रक क्र-मकसी-1007/प्रक्र 36/का-36 दिनांक 10/7/2008 मधील तरतूदी लागु राहतील.
30. शासकीय नोकर भरतीला लागु असणारे सर्व नियम या भरतीला लागु राहतील.
31. उमेदवाराने जाहिरातीतील पदासाठी विहित अर्हता धारण केली म्हणजे त्यास लेखी परिक्षेस / मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार विहित अर्हता धारण करीत नाही असे आढळल्यास गैरवर्तन करतांना आढळल्यास, दबावतंत्राचा वापर करतांना आढळल्यास त्यांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.
32. रिक्त पदाच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची तसेच सामाजिक व समांतर आरक्षणात बदल होण्याची शक्यता असल्याने त्याबाबत अर्जदारास कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, सामाजिक व समांतर आरक्षण याबाबत बदल करणे व रद्द करणे अंशत: बदल करणे तसेच संपुर्ण भरती प्रक्रिया रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती विभाग, अमरावती यांनी राखून ठेवले आहेत.

## परिक्षा शुल्क

खुल्या प्रवर्गात अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी रुपये 800/-
राखीव प्रवर्गात अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी रुपये 400/-

## ऑनलाईन अर्ज सादर करण्याची पध्दत

1. सर्व पात्र उमेदवारांनी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत http://maharectuitment.mahaonline.gov.inया संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक (Link) उघडावी. तसेच ऑनलाईन व्दारे अर्ज डाऊनलोड झाल्यानंतर अर्जाची प्रिंट काढुन अर्जाची प्रत व चालनाची प्रत अपर आयुक्त,आदिवासी विकास,अमरावती पोलीस आयुक्तालयाजवळ ,टि.बी.हॉस्पीटलच्या मागे अमरावती या पत्यावर डाकेने पाठविण्यात यावी. हस्तेपोहोच अर्ज स्विकारण्यात येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.
2. पात्र उमेदवाराला वेबबेस्ड (Web-bssed) ऑनलाईन अर्ज दिनांक- ते या कालावधीतच http://maharectuitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील.
3. उमेदवाराने जाहीरात काळजीपुर्वक वाचावी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी उपराक्त संकेतस्थळावर"Apply Online" या लिंकवर क्लिक करुन सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी. यानंतर रजिस्टर (Register) या बटणावर क्लिक करुन सर्वप्रथम प्राथमिक माहिती करावी.यानंतर रजिस्टर (Register) या बटणावर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी.अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. आवश्यक माहिती भरल्यानंतर नोंदणी झाल्यावर संगणक प्रणाली तुमच्या लॉगिन आयडी आणि पासवर्ड निर्माण करुन तुम्हाला तुमच्या स्क्रिनवर दाखवेल. याची प्रिंट काढण्याची सुविधा आहे.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतांना उमेदवराने स्वत:च्या अद्यावत फोटो (रुंदी 3.0से.मी.Xउंची 4.5 से.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी ( रुंदी 3.0से.मी.X उंची 2.5 से.मी.) आणि DPI RESOLUTION आणि 50 KB पेक्षा कमी साईज होईल अशा विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे,(टिप – फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्यांचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी.) प्रवेशपत्रावर/ अर्जावर दुसऱ्याचा फोटा/ स्वाक्षरी असल्यास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याच्या सूचना http://maharectuitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.अर्ज ऑनलाईन अथवा महा ई सेवा केंद्राव्दारे भरता येईल. महाऑनलाईन लिमिटेड या संस्थेकडुन प्रत्येक जिल्हयात महा ई सेवा केंद्र उघडण्यात आलेले आहे. या महा ई सेवा केंद्राची यादी http://mahaonline.gov.in किंवा http://maharectuitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर आपले खाते तयार केले नसल्यास उमेदवारास नविन वापर कर्ता नोंदणी वर क्लिक करुन युझर नेम व पासवर्ड तयार करावा लागेल.

त्यानंतर उमेदवारास " प्रोफाईल निर्मिती" मध्ये जाऊन स्वत:ची संपुर्ण माहिती भरावी लागेल.

http://maharectuitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर यापूर्वी प्रोफाईल निर्मिती स्वत:ची माहिती भरलेली असल्यास पुन्हा भरण्याची आवश्यकता नाही. उमेदवार स्वत:ची प्रोफाईल माहिती कधीही अद्ययावत करु शकतो. उमेदवाराने युझरनेम व पासवर्डची नोंद करुन लॉग ईन केल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाच्या लिंकवर क्लिक करावे. त्या कार्यालयाअंतर्गत उपलब्ध जाहिराती "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा. " या संदेशासह दाखविल्या जातील.

क्लिक केल्यानंतर आपण जाहिरातीत नमुद शैक्षणिक पात्रता/ अनुभव/इतर बाबीची पुर्तता करीत असल्यास आपला अर्ज स्विकारल्या जाईल. अन्यथा आपला अर्ज दाखल न होण्याचे कारण दाखविले जाईल.

ज्या उमेदवारांना इंटरनेट द्वारे स्वत: अर्ज भरावयाचा नसेल. असे उमेदवार महा ई सेवा केंद्रामार्फत आपला अर्ज करु शकतात. त्याच वेळी उमेदवारांकडुन परीक्षा शुल्क व रुपये -------- ऐवढी रोख रक्कम घेतली जाईल. उमेदवारांना पैसे भरण्याची पावती (RECEPIT) महा ई सेवा केंद्रातर्फे देण्यात येईल. या सुविधेमध्ये आवेदन अर्ज भरणे व पैसे भरल्यानंतर पैसे भरल्याची पावती देणे याचा समावेश असेल. फोटो/स्वाक्षरी स्कॅन किंवा अर्जाच्या प्रिंट करीता स्वतंत्र रक्कम केंद्र चालकाकडुन आकारली जाईल. स्वत: ऑनलाईन पध्दतीनेअर्ज सादर करणारे उमेदवार कार्यालयाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरु शकतील.

**परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता उमेदवारानी खाली नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.**

1. उमेदवाराने भारतीय स्टेट बॅकेंत चालानव्दारे, नेटबँकींग, डेबीटकार्ड, क्रेडीटकार्ड परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खालील पध्दतीचा अवलंब करावा.
2. युझरनेम व पासवर्डची नोंद करुन लॉगईन केल्यानंतर मुख्य पृष्ठावरील भागातील माझे खाते या लिंकवर क्लिक करावे. (2) "माझे खाते" या लिंकवर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर " Unpaid" असे लिहिलेले असेल. त्या ठिकाणी "Pay Now" अशी लिंक उपलब्ध असेल. (3) "Pay Now" या लिंकवर क्लिक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील (1) ऑनलाईन पेमेंट (2)चलनाद्वारे (3)उमेदवारांन क्रेडीट कार्ड, डेबीटकाड अथवा नेट बँकींग सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकापूर्वी पुर्ण करणे आवश्यक राहील (4) उमेदवाराने

चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयानी वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. ( 5) चलनाद्वारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बँक उमेदवारांकडुन परीक्षा शुल्क व्यतिरीक्त नियमानुसार सेवा शुल्क आकारेल. अशाप्रकारे उमेदवारास चलनाद्वारे शुल्क भरतांना परीक्षा शुल्क + बँकेचे सेवा शुल्क भरावे लागतील. (6) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करण्यासाठीच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

3. उमेदवाराने प्रिंटचलन (Print Challan) या बटणावर क्लिक करुन चलन प्रिंट करावे. या प्रिंट केलेल्या चलनावर उमेदवाराने त्याच्या प्रवर्गानुसार परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑक इंडीय (State Bank Of India) या बँकांच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यलयीन कामकाजाच्या दिवशी वरीलप्रमाणे नमुद केलेल्या विहित मुदतीच्या आत भरणे आवश्यक राहील. व याची एक प्रत नमुद केलेल्या विहित मुदतीच्या आत भरणे आवश्यक राहील. याची एक प्रत उमेदवाराने स्वत:कडे जपुन ठेवावी.

**किंवा**

4. उमेदवारानी इंटरनेट बँकींग अथवा क्रेडीट/डेबीट कार्डद्वारे त्यांच्या प्रवर्गानुसार परीक्षा शुल्क विहित मुदतीच्या आात भरावे.
5. परीक्षा शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने “अर्ज भरा” या लिंक वर क्लिक करुन, आपला उर्वरीत अर्ज भरुन पुर्ण करावा. आपला अर्ज भरतांना उमेदवाराने स्वत:चा पासपोर्ट साईजमधील फोटो व स्वाक्षरी उपलोड करणे अनिवार्य आहे. माहिती पुर्ण भरल्यानंतर उमेदवाराने अर्जाची प्रिंट स्वत: काढावी. व कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करण्यासाठी जतन करुन ठेवावी.
6. विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
7. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना स्वत:चा मोबाईल नंबर व ई-मेल आयडी काळजीपुर्वक भरावा.

**<u>इतर महत्वाच्या सुचना</u>**

1. परीक्षा केंद्र अमरावती येथे राहील किंवा त्या त्या जिल्हयातील उमेदवारास त्यांचे जिल्हयाचे ठिकाणी परीक्षा केंद्र उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था केली जाईल. एखादया जिल्हयात उमेदवार जास्त झाल्यास त्यांना इतर जिल्हयातही परीक्षाकेंद्र उपलब्ध करुन देण्यात येईल.
2. प्रस्तुत परीक्षेपुर्वी 5 दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश पत्र व नमुद केलेल्या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेता येईल. सदर प्रवेशपत्र उमेदवाराने परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.
3. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने उपरोक्त प्रवेश प्रमाणपत्र आणणे आवश्यक आहे.
4. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वत:चे छायाचित्र असलेले मुळ ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. (उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणुक ओळखपत्र, वाहनपरवाना )
5. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही उमेदवाराने संबंधित बँकांच्या कार्यालयीन वेळेत दिनांक26/4/2017 पर्यंत भरणे आवश्यक आहे.
6. विहीत दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही. भरलेल्या परीक्षा शुल्काचा परतावा केला जाणार नाही.
7.

**<u>परीक्षेचे स्वरुप</u>**

| अ.क्र. | संवर्ग | परीक्षेसाठीचे गुण | एकुण गुण |
|---|---|---|---|
| | | लेखीपरीक्षा<br>मराठी/इंग्रजी/बुध्दीमत्ता चाचणी/ सामान्य ज्ञान | |
| 1. | गृहपाल (स्त्री) | 100 प्रश्न (प्रत्येकी 2 गुण) | 200 |
| 2. | गृहपाल (पुरुष) | 100 प्रश्न (प्रत्येकी 2 गुण) | 200 |
| 3. | अधिक्षिका (स्त्री) | 100 प्रश्न (प्रत्येकी 2 गुण) | 200 |

8. अ.क्र. 1 ते 3 या संवर्गातील पदाच्या लेखी परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, बुध्दीमत्ता चाचणी व सामान्य ज्ञान या विषयांवर वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असतील. सदर अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील पदवी स्तरावरील दर्जाचा असेल तसेच मराठी या विषयावरील प्रश्न हे महाराष्ट्र राज्यातील उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जासमान राहील
9. उपरोक्त 200 गुणांच्या लेखी परीक्षेसाठी एकत्रितपणे दोन तासांचा कालावधी अनुज्ञेय राहील.

**विशेष सुचना**

1. प्रवेशपत्र उमेदवाराने स्वत: डाऊनलोड करावयाचे आहे.
2. ऑनलाईन स्वरुपात निर्देशित स्वरुपात परीक्षा केंद्रावरच परीक्षा होईल.
3. प्रवेशपत्रावर परीक्षा केंद्र व वेळ नमुद राहील.
4. ऑनलाईन अर्जामध्ये भरलेली माहिती आणि कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर केलेली कागदपत्रे यात तफावत असल्यास उमेदवाराची निवड भरतीप्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल. अथवा उमेदवाराने मागितलेले सामाजिक/ समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिल करणे इत्यादी बदल सवलतीनुसार बदल/ सवलती नामंजर करण्यात येतील.
5. गुणवत्ता यादीमध्ये अंतभुत उमेदवारांसाठी कागदपत्रे पडताळणी कार्यक्रम प्रसिध्द केला जाईल. अशा उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या सुचनेप्रमाणे त्यांना कागदपत्रे छाननीसाठी ठरवुन दिलेल्या दिनांकास वेळेवर स्वखर्चाने ठरवुन दिलेल्या ठिकाणी मुळ कागदपत्रे व साक्षांकीत प्रतीसह व्यक्तीश: उपस्थित राहणे अनिवार्य राहील.
6. सदर दिवशी विहित वेळेत व ठिकाणी सदर उमेदवार कागदपत्र छाणनी साठी अनुपस्थित राहील्यास अथवा अपुरे कागदपत्र सादर केल्यास उमेदवार अपात्र ठरविल्या जाईल. याबाबत कोणतीही विनंती/ तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कागदपत्र पडताळणी प्रक्रीयेअंती सादर केलेली कोणतीही कागदपत्र विचारात घेतली जाणार नाही.
7. वरील प्रमाणे गुणवत्ता यादीतील उमेदवारांची कागदपत्रांची छाणनी करीता व छाननी नंतर गुणसंख्येच्या आधारे अंतिम निवडयादी तयार केली जाईल.
8. सदर जाहिराजी संदर्भात काही अडचणी असल्यास उमेदवार महाऑनलाईचे दुरध्वनी क्रमांक 022-61306411 या हेल्पलाईन वर संपर्क करु शकतात.

**संमातर आरक्षणाबाबत महत्वाच्या सुचना**

| | | |
|---|---|---|
| 1 | महिला उमेदवार | महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक 82/2001/मसेआ/2000/प्र.क्र.415/का.2/दि.25/05/2001 मधील तरतुदीनुसार राहील. खुल्याप्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्तीगट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांनी माहे मार्च, 2016 अखेरचे या कालावधीतील नॉन-क्रिमीलअर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |

ठिकाण:- अमरावती

दिनांक- 18/3/2017

(गिरीश सरोदे)
**अपर आयुक्त,**
**आदिवासी विकास, अमरावती तथा**
**अध्यक्ष निवड समिती,अमरावती**

1.परिक्षा कक्षात ,परिक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रानिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
2. प्रमाणपत्र पडताळणी वेळी प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास/माहिती खोटी आढळल्यास अथवा एखादे प्रमाणपत्र सादर न केल्यास उमेदवाराला त्याचवेळी पुढील प्रक्रियेसाठी अपात्र केले जाईल.